**विशेष दिवाणी दावा क्र.३९/२०१५ मधील नि.७६ खालील आदेश**
**वरदीचंद गांधी वगैरे वि. सचिन चव्हाण वगैरे**
**CNR NO.MHST050003892015**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वादींनी सदरचा दावा हा दावा कलम १ब,१क व १ड मधील तथाकथीत खरेदीपत्र रद्द करुन मागणेकरीता दाखल केलेला आहे. सन १९६९ चे खरेदीपत्रानुसार प्रत्यक्षात जागेवरती कोणतेही शिल्लक क्षेत्र नसतानाही या दाव्यातील प्रतिवादी क्र.२ ते ६ यांनी जाणूनबुजून वादींना त्रास देणेचे हेतूने प्रतिवादी क्र.१ यांचेशी दांडगाईने व संगनमताने एकत्र येवून व रेव्हेन्यु अधिका–यांना हाताशी धरुन तथाकथीत बेकायदेशीर खरेदीपत्राचे व्यवहार रेकॉर्डवर नोंदवून वादींचे वहिवाटीस हरकत अडथळा करुन वादी नं.१ ते ५ यांचे असणारे दावा कलम १अ या मिळकतीमधील प्लॉटमधील क्षेत्रापुढे असणारी खुली जागा अनाधिकाराने कबजात घेवून वादींची दारकोंडी करणेचे दुष्ट हेतूने वादींचा येणे जाणेचा संपूर्ण रस्ता बंद करुन प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी दावा दाखल तारखेपासून हरकत अडथळा करणेस सुरुवात केली आहे. तसेच वादींचे दावा कलम १अ या मिळकतीमधील प्लॉटचे समोर अनाधिकाराने खोकी, पत्रयाचे शेड वगैरे निर्माण करुन त्यांची दारकोंडी करणेचा प्रयत्न केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.११ यांनी वादींना त्रास देत असतानाच दरम्यानचे काळात दि.३१.०७.२०१८, दि.२७.०५.२०१९ व दि.०६.०६.२०१९ रोजी दावा कलम १अ मिळकतीपैकी काही भाग मंगल कल्लाप्पा शिवशरण व अनिल नारायण लोकरे यांना विक्री केला असल्याने त्यांना सदर दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे झाले आहे. सदरची

दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असून सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. म्हणून वादींनी अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी सदर अर्जास नि.१०० वर म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविली आहे. प्रतिवादींचे म्हणण्यानुसार, सामील केलेल्या प्रतिवादीमध्ये या दाव्यातील प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकतीचा मूळ खरेदीदार व पुर्वहक्कदार असलेने त्यांनी केलेले पुढील तबदीलीचे व्यवहार हे दावा दाखल केलेनंतर झालेले असलेने मुलत: प्रतिवादी क्र.१ यासच कब्जे वहिवाटीस मिळकत नसेल तर पुढील खरेदीदारांना येणार नसलेने नवीन प्रतिवादींना या दाव्याचे कामी सामील करणेची आवश्यकता नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता सदरचा दावा हाथाकथीत खरेदीपत्र रद्द करुन मागणेकरीता दाखल केलेला आहे.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदर प्रकरणामध्ये दावा कलम १अ मिळकतीपैकी काही भाग मंगल कल्लाप्पा शिवशरण व अनिल नारायण लोकरे यांना विक्री केला असल्याने त्यांना सदर दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे. नियोजित दुरुस्ती ही दावा गुणदोषावर निकाली होणेकरीता आवश्यक आहे. तसेच दाव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीताही दुरुस्ती आवश्यक आहे. सदरचा दावा अद्याप चौकशीकरीता लागलेला नाही. वादीने मागितलेली सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणत्याही प्रकारचा बदल

होणार नाही. नियोजित दुरुस्ती झालेस प्रतिवादी यांचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर करणे मला न्यायोचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्त करावा व दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

JYOTI JAGNNATH MANE
Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.01.23 17:10:22 +0530

ठिकाण – कराड (जे.जे.माने)
दिनांक – २३/०१/२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड